ePaper

'सिंधू' करार स्थगितीनंतर पाकिस्तानला आणखी एक धक्का!

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™



पुणेकरांचा पाणीपुरवठा सुरक्षित!

पान 2 वरुन...

WWW.MAHAENEWS.COM | शनिवार, दि. 04 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे १७ तर सुनील तटकरेंचे ८ कॉल

भोंदूबाबा अशोक खरातला रूपाली चाकणकरांचे तब्बल १७७ कॉल्स

महाईन्यूज।
मुंबई

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाची राज्यात मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू आहे. भोंदू अशोक खरातला बलात्काराच्या आरोपाखाली पोलिसांनी अटक केलं असून या संपूर्ण प्रकरणाची एसआयटीद्वारे चौकशी सुरू आहे. या प्रकरणात दररोज अनेक धक्कादायक खुलासे समोर येत आहेत. याच अशोक खरातबरोबर राज्यातील अनेक दिग्गज नेत्यांचेही फोटो समोर आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती.

दरम्यान, अशोक खरात प्रकरणात आता सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया आणि शिवसेना ठाकरे गटाच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी आरोप केले आहेत. अशोक खरातला कोणी किती कॉल केले? याची यादीच अंजली दमानिया यांनी वाचून दाखवली आहे. तसेच सुषमा अंधारे यांनीही फेसबुकला पोस्ट शेअर करत यावर भाष्य केलं आहे.

"खरी माहिती जनतेसमोर येत नाही. त्यामुळे ही माहिती मी जनेतसमोर ठेवण्याचा प्रयत्न करत आहे. एकनाथ शिंदे यांच्यासारख्या व्यक्तीचे खरातला १७ कॉल झाले असतील तर याचं उत्तर एकनाथ शिंदे यांनी देणं गरजेचं आहे. तसेच चंद्रकांत पाटील यांचे खरातला ८ कॉल, तर सुनील तटकरे यांचे ८ कॉल झाले आहेत आणि आशिष शेलार यांचाही एक कॉल आहे. हे मी फक्त फोन कॉलबाबत सांगितलं आहे. अशोक खरातबरोबर सर्वाधिक कोन बोललं असेल तर त्यामध्ये दुसऱ्या नंबरवर रुपाली चाकणकर या आहेत. ३३ हजार ७२७ सेकंद रुपाली चाकणकर या खरातशी बोलल्या आहेत", असे आरोप अंजली दमानिया यांनी केले आहेत.

अंजली दमानिया यांनी काय आरोप केले?

"रुपाली चाकणकर यांचे एकूण १७७ कॉल अशोक खरातला झाले आहेत. तसेच त्यांच्या बहिणीचेही २३६ कॉल खरातला झाले आहेत. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे तब्बल १७ कॉल्स अशोक खरतला झाले होते. या १७ कॉल्सपैकी १० इनकमिंग आणि ७ आऊटगोईंग कॉल होते. या कॉलमध्ये सर्वाधिक वेळ २१ मिनिटे त्यांच्या संभाषण झालं", असा आरोप अंजली दमानिया यांनी केला आहे.

सुषमा अंधारे यांनी फेसबुक पोस्टमध्ये काय म्हटलं?

"रुपाली चाकणकर यांचे एकूण १७७ कॉल अशोक खरातला झाले, तर त्यांच्या बहिणीचे २३६ कॉल खरातला झाले आहेत. तसेच शिंदे यांचे १७ कॉल अशोक खरातला झाले. एकनाथ शिंदे यांचे सर्वात जास्त संभाषण २१ मिनिटांचं आहे. सर्वसामान्य जनतेपुढे ही माहिती यायला हवी म्हणून मी हे सर्व सांगत आहे. अशा व्यक्तीसोबत एकनाथ शिंदे यांचे १७ कॉल झाले आहेत, (१० इनकमिंग आणि ७ आऊटगोईंग) तर ते कॉल कशा संदर्भात झाले? ते त्यांनी सांगणं गरजेचं आहे. तसेच चंद्रकांत पाटील आणि सुनील तटकरे यांचे प्रत्येकी ८ कॉल झाले आहेत. हे सगळे नॉर्मल कॉल आहेत, व्हॉट्सॲपबद्दल माहिती नाही. व्हॉट्सॲपची माहिती मिळत नसते. आता पाहायला गेलं तर सर्वाधिक संपर्क कोणासोबत झाला, तर तो रूपाली चाकणकर यांच्यासोबत आहे. ३३ हजार पेक्षा जास्त सेकंद चाकणकर यांच्यासोबत बोलणं झालं", असं सुषमा अंधारे यांनी फेसबुक पोस्टमध्ये म्हटलं आहे.

पुणेकरांचा पाणीपुरवठा सुरक्षित!

महापालिकेने भरले २५ कोटी; खडकवासला विभागाची ऐतिहासिक वसुली

महाईन्यूज । पुणे

पाणीपट्टी थकबाकीवरून शहराचे पाणी बंद करण्याचा इशारा जलसंपदा विभागाने दिल्यानंतर महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने २५ कोटी रुपये तातडीने जलसंपदा विभागाकडे जमा केले आहेत. त्यामुळे तूर्तास शहराचा पाणीपुरवठा बंद न करण्याची भूमिका जलसंपदा विभागाने घेतली असून महापालिकेने आत्तापर्यंत थकबाकीपोटी एकूण २५१ कोटी रुपये भरल्याची माहिती जलसंपदा विभागाकडून देण्यात आली.

> पाणीबंदच्या इशाऱ्यानंतर पुणे महापालिकेने २५ कोटींची रक्कम थकबाकीपोटी भरली आहे. त्यामुळे तूर्तास पाणीपुरवठा बंद करण्यात येणार नाही.
>
> - किरण देशमुख, कार्यकारी अभियंता, खडकवासला जलसंपदा विभाग.

पुणे महापालिकेकडी पाणीपट्टी वसुली

- एकूण रक्कम - २०२ कोटी
- समायोजन केलेली रक्कम - ४९ कोटी
- एकूण वसुली – २५१ कोटी

दरम्यान, सिंचन, बिंगर सिंचनापोटीची एकूण ४४५.६७ कोटी रुपयांची पाणीपट्टी वसुली खडकवासला पाटबंधारे विभागाने केली असून, हा सर्वाधिक पाणीपट्टी वसूल करणारा हा राज्यातील एकमेव विभाग ठरला असल्याचा दावाही करण्यात आला आहे. महापालिका आणि जलसंपदा विभागात पाणीपट्टी बिलाच्या थकबाकीवरून अनेक वर्षांपासून वाद आहेत. या वादाच्या पार्श्वभूमीवर थकबाकीची रक्कम तातडीने न भरल्यास शहराचा पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा जलसंपदा विभागाने दिला होता. त्याबाबतची नोटीसही महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाला बजाविण्यात आली होती.

महापालिकेकडून नागरी वापरासाठी पाणी घेतले जाते. जलसंपदा विभागाबरोबर झालेल्या करारानुसार घरगुती आणि व्यावसायिक दराने पाण्याची देयके दिली जातात. मात्र, जलसंपदा विभाग औद्योगिक वापराच्या दराने पाणीपट्टीची देयके पाठवित आहे. तसेच, थकबाकीवर दहा टक्के दंडाची आकारणीही केली जात आहे, असा दावा करून या संदर्भात जल प्राधिकरणाकडे आणि मुख्यमंत्र्यांकडे महपालिकेने तक्रार केली होती.

या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बैठक घेतील, असेही सांगितले जात होते. मात्र, महापालिकेकडून २५ कोटी रुपयांची रक्कम जमा करण्यात आली आहे. त्याबरोबरच पिंपरी-चिंचवड महापालिकेनेही २० कोटी रुपये थकबाकी पोटी जमा केले आहेत. महापालिकेकडे असलेल्या थकबाकीच्या रकमेपैकी एकूण २५१ कोटी रुपये वसूल करण्यात आले आहेत. त्यामध्ये एकूण दिलेल्या २०२ कोटी रुपयांचा आणि समायोजित ४९ कोटी रुपयांच्या रकमेचा समावेश आहे,' अशी माहिती खडकवासला पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता किरण देशमुख यांनी दिली.

'पीएमआरडीए' हद्दीत हक्काच्या घरांसाठी 'ॲक्शन प्लॅन'!

महाईन्यूज । पुणे

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) हद्दीतील ६७४ गावांमधील 'पंतप्रधान आवास योजने'ला (PMAY) गती देण्यासाठी पीएमआरडीएने विशेष 'ॲक्शन प्लॅन' तयार केला आहे. केवळ अर्ज मागवून न थांबता, सर्व पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कार्यान्वित करण्याचे सक्त निर्देश महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी दिले आहेत. यामुळे पीएमआरडीए हद्दीतील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी हक्काच्या घरांचा मार्ग मोकळा झाला आहे.

गावठाणांमधील प्रस्तावांना बळ

'पंतप्रधान आवास योजना- २' अंतर्गत गावठाण भागातील प्रस्तावांनाही मंजुरी देण्याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे संकेत महानगर आयुक्तांनी दिले आहेत. ग्रामीण व निमशहरी भागातील वाढती लोकसंख्या आणि जागेची टंचाई पाहता हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. या धोरणात्मक निर्णयामुळे प्रलंबित प्रस्तावांना गती मिळणार असून, सर्वसामान्यांचे घराचे स्वप्न साकार होण्यास मदत होईल.

अभियांत्रिकी विभागाच्या आढावा बैठकीत डॉ. अभिजित चौधरी बोलत होते. या वेळी प्रकल्पातील तांत्रिक अडथळे दूर करण्यासाठी आणि अंमलबजावणीला वेग देण्यासाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. योजनेच्या अंमलबजावणीत येणाऱ्या तांत्रिक अडचणी वेळेत सोडवण्यासाठी 'शहरस्तरीय तांत्रिक कक्ष' (CLTC) स्थापन करण्यात येणार आहे. या कक्षासाठी आवश्यक असलेल्या तज्ज्ञांची पदे तातडीने भरण्याच्या सूचना महानगर आयुक्तांनी दिल्या आहेत. तसेच, 'लाभार्थी आधारित बांधकाम' (BLC) आणि 'भागीदारीतून परवडणारी घरे' (AHP) या दोन प्रमुख घटकांसाठी अनुभवी व तज्ज्ञ संस्थांची नियुक्ती केली जाणार आहे. यामुळे प्रकल्पाच्या दर्जासोबतच कामाचा वेग वाढण्यास मदत होणार आहे.

परवडणाऱ्या घरांसाठी जमिनीची उपलब्धता हा मोठा अडथळा ठरतो. यावर उपाय म्हणून पीएमआरडीए हद्दीतील नऊ तालुक्यांमध्ये मोक्याच्या शासकीय जागांचा शोध घेण्याची मोहीम राबवली जाणार आहे. या जागांवर 'एएचपी' घटकांतर्गत गृहप्रकल्प उभारण्याच्या शक्यतेची पडताळणी केली जाईल. शक्यतो प्रत्येक विधानसभा मतदारसंघात किमान एक तरी प्रकल्प उभारण्याचे नियोजन पीएमआरडीएकडून केले जात आहे.

“जलस्वयंपूर्ण पिंपरी-चिंचवड” संकल्पनेसाठी भाजपा आग्रही!

महापौर, शहराध्यक्ष, आमदारांचा ‘मॅरेथॉन’ पाठपुरावा

महाईन्यूज । पिंपरी चिंचवड

सुमारे ४० लाख पिंपरी-चिंचवडकरांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत पाणी प्रश्नावर आगामी २५ वर्षांचे नियोजन करणे आणि शहराला ‘जलस्वयंपूर्ण’ करण्यासाठी भारतीय जनता पार्टी आग्रही पाठपुरावा करीत आहे. त्यासाठी महापौर रवि लांडगे, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप यांच्यासह सत्तारुढ पक्षनेते प्रशांत शितोळे आणि स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे आपआपल्या पातळीवर प्रभावशाली पाठपुरावा करीत आहेत.

पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या आंद्रा, भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेच्या कामाची दोन दिवसांपूर्वी महापौर रवि लांडगे यांनी पाहणी केली. संबंधित ठेकेदाराचे काम प्रशासनाने रद्द केले आहे. त्या ठिकाणी नवीन ठेकेदार नियुक्ती करावा आणि नव्याने निविदा प्रक्रिया राबवावी, अशी सूचना त्यांनी प्रशासनाला दिली होती.

तत्पूर्वी, महाराष्ट्र विधिमंडळाच्या नुकत्याच झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये आमदार महेश लांडगे आणि आमदार शंकर जगताप यांनी शहराच्या आवश्यकतेनुसार, अतिरिक्त जलस्त्रोत निर्मिती, पवना बंद जलवाहिनी प्रकल्प सुरू करणे याबाबत राज्य सरकारचे लक्ष वेधले होते. चासकमान धरणातून आणि मुळशी धरणातून शहरासाठी पाणी आरक्षीत करावे, अशी मागणी केली होती. विशेष म्हणजे, पवना धरणातून अतिरिक्त १०० एमएलडी पाणी आरक्षणासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सकारात्मक आश्वासनही दिले आहे.

दरम्यान, महानगरपालिका अर्थसंकल्पीय सर्वसाधारण सभा झाली. त्यावेळी शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न काटे यांनी शहराचा पाणी पुरवठा आणि अपेक्षीत कार्यवाही यावर सभागृहात प्रभावी मागणी केली. सर्वसामान्य नागरिकांना पुरेसा पाणी पुरवठा करण्याबाबत भारतीय जनता पार्टी व आम्ही सर्व नगरसेवक कटिबद्ध आहोत. त्यासाठी प्रशासनाने सर्वोतोपरी कार्यवाही करावी, असे ठणकावले होते.

विशेष म्हणजे, प्रशासनाने सादर केलेल्या अर्थसंकल्पामध्ये पाणी पुरवठा योजनांसाठी शून्य इतकी तरतूद होती. स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी ही तरतूद ५० कोटींची केली आहे. त्यामुळे पाणी पुरवठा योजनांना चालना मिळणार असून, निर्धारित वेळेत प्रकल्प पूर्ण होणार आहेत.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, सत्ताधारी भाजपाचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी सातत्याने विविध स्तरावर आढावा बैठका, पाहणी दौरा करीत आहेत. तसेच, शहरातील भाजपा आमदार राज्य शासनाकडे प्रभावीपणे मागणी करीत आहेत. सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांमुळे शहरातील प्रस्तावित पाणी पुरवठा योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सकारात्मक दबाव निर्माण झाला आहे. त्यामुळे प्रशासन आता ‘अलर्ट मोड’ वर असून, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनीही पाणी पुरवठ्याच्या मुद्याला प्राधान्याने हातात घेतले आहे.

“शहरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ आणि नियमित पाणीपुरवठा मिळणे, हा शहरवासीयांचा हक्क आहे. त्यासाठी पक्षाचे लोकप्रतिनिधी सक्षमपणे पाठपुरावा करीत आहेत. आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पाच्या पाहणीसाठी विरोधी पक्षनेतासुद्धा आले होते. या प्रकल्पाच्या जुन्या ठेकेदाराने ४ वर्षे प्रकल्प रखडवला. त्याच्या कामाला स्थगिती दिली आहे. नवीन निविदा प्रक्रिया राबवून ८ महिन्यांमध्ये सदरचे काम पूर्ण करण्यात येईल. त्यामुळे १६७ एमएलडी पाणी शहराला मिळणार आहे.

- रवि लांडगे, महापौर, पिंपरी-चिंचवड, पुणे.

“पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या आणि पाण्याची मागणी याचा विचार करता अतिरिक्त जलस्त्रोत निर्माण करण्याची आवश्यकता आहे. आंद्रा, भामा आसखेड प्रकल्प, पवना बंद जलवाहिनी प्रकल्प पूर्ण क्षमतेने सुरू करणे. नवीन जलस्त्रोत निर्माण करुन पाणी पुरवठा यंत्रणा सक्षम करण्यासाठी आम्ही आग्रही आहोत. त्यासाठी महापालिका, राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडेही पाठपुरावा करण्यात येत आहे. आगामी काळात पाण्यासाठी पिंपरी-चिंचवड आत्मनिर्भर होईल, असा विश्वास आहे.

- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

“पिंपरी-चिंचवडकरांना पाणी पुरवठा सक्षमपणे देण्याकामी आम्ही प्रयत्नशील आहोत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे यांच्या सहकार्याने तसेच महापालिकेतील महापौर, सत्तारुढ पक्षनेते यांच्या नेतृत्त्वामध्ये आम्ही पाणी पुरवठा योजनांना पहिले प्राधान्य दिले आहे. अर्थसंकल्पात पाणी योजनांना निधी कमी पडणार नाही. त्यामुळे संबंधित प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण होतील, यात शंका नाही.

- अभिषेक बारणे, अध्यक्ष, स्थायी समिती, पिंपरी-चिंचवड, पुणे.

“पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रशासकीय काळात पाणी पुरवठा योजनांचे प्रकल्प रखडले आहेत. महापालिका सभागृहामध्ये आता लोकप्रतिनिधी आहेत. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या जीवनाशी निगडीत प्रमुख प्रश्न असलेल्या पाणी पुरवठाबाबत आम्ही संवेदनशील आहोत. पवना योजनेतील पाणी उपसा रावेत बंधाऱ्यातून आणि आंद्रा योजनेतील पाणी उपसा निघोजे बंधाऱ्यातून होतो. त्या ठिकाणी पाणी प्रदूषणाची गंभीर समस्या आहे. त्यासाठी टर्शरी ट्रिटमेंट प्लॅंट उभारणे आणि प्रस्तावित प्रकल्प कालबद्ध नियोजन करुन पूर्ण करणे, असे ध्येय आहे.

- प्रशांत शितोळे, सत्तारुढ पक्षनेता, भाजपा.

भूमिका

चार राज्ये आणि एक केंद्रशासित प्रदेश यांतील विधानसभा निवडणुकांचा प्रचार आता अंतिम टप्प्यात पोहोचला असून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि केरळ ही चार राज्ये तसेच पुदुच्चेरी या केंद्रशासित प्रदेशात होणारी ही निवडणूक फेरी केवळ प्रादेशिकच नव्हे तर राष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीनेही अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे.

देशाची राजकीय दिशा ठरवणारी निवडणूक!

गेल्या काही आठवड्यांत मध्यपूर्वेतील युद्धामुळे देशातील राजकीय चर्चेला काही प्रमाणात मागे पडावे लागले असले, तरी प्रत्यक्षात या निवडणुकांचे परिणाम आगामी राष्ट्रीय राजकारणाची दिशा ठरविणारे ठरू शकतात. भारतीय जनता पक्षासाठी या निवडणुकीत सर्वाधिक लक्ष केंद्रित झाले आहे ते आसाम आणि पश्चिम बंगाल या राज्यांवर. आसाममध्ये सत्ताधारी पक्ष मित्रपक्षांच्या मदतीने सलग तिसऱ्यांदा सत्ता टिकविण्याचा प्रयत्न करीत आहे. राज्यातील विकासकामे, पायाभूत सुविधा आणि कायदा-सुव्यवस्था या मुद्द्यांवर भर देत भाजप मतदारांचा विश्वास टिकवण्याचा प्रयत्न करीत आहे. दुसरीकडे पश्चिम बंगालमध्ये मागील निवडणुकीत लक्षणीय यश मिळाल्यानंतर यावेळी सत्तेपर्यंत पोहोचण्याची महत्त्वाकांक्षा भाजपने जपलेली दिसते. तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यातील संघर्ष हा केवळ राजकीय नसून प्रतिष्ठेचा बनला आहे. त्यामुळे या राज्यातील लढत अत्यंत चुरशीची आणि लक्षवेधी ठरणार आहे.

तामिळनाडूत परंपरेप्रमाणे द्रमुक आणि अद्रमुक या दोन प्रमुख प्रादेशिक पक्षांमधील संघर्षच केंद्रस्थानी आहे. द्रमुकचे नेतृत्व गेल्या दहा वर्षांपासून सत्तेत असून त्यांनी सामाजिक कल्याणकारी योजना, पायाभूत सुविधा आणि उद्योगवाढ यावर भर दिला आहे. त्यामुळे सत्तेची हॅटट्रिक साधण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. मात्र जयललिता यांच्या निधनानंतर काही काळ कमकुवत झालेला अद्रमुक पक्ष आता पुन्हा संघटित होत निवडणूक मैदानात उतरला आहे. भाजप आणि इतर काही लहान पक्षांसोबत केलेली युती ही या पक्षासाठी निर्णायक ठरू शकते. त्याचबरोबर नव्याने स्थापन झालेल्या काही पक्षांच्या प्रवेशामुळे मतांचे विभाजन होण्याची शक्यता वाढली असून त्यामुळे निकाल अधिक अनिश्चित बनला आहे.

केरळमध्ये नेहमीप्रमाणे डावी आघाडी आणि काँग्रेस आघाडी यांच्यात थेट संघर्ष आहे. गेली दोन कार्यकाळ सत्ता सांभाळलेल्या डाव्या आघाडीसमोर यावेळी सत्ता टिकविण्याचे मोठे आव्हान आहे. शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक सुरक्षा या क्षेत्रांतील कामगिरी हा त्यांचा मुख्य आधार आहे. दुसरीकडे काँग्रेस आघाडीने अलीकडील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये मिळवलेल्या यशामुळे आत्मविश्वास वाढवला आहे. त्यामुळे केरळमध्ये सत्तांतराची शक्यता व्यक्त केली जात असून हा राज्यातील निकाल राजकीय दृष्ट्या महत्त्वाचा ठरू शकतो.

पुदुच्चेरी हा आकाराने लहान प्रदेश असला तरी येथे सत्तेची लढत राष्ट्रीय आघाड्यांसाठी प्रतिष्ठेची मानली जाते. सध्या सत्तेत असलेली राष्ट्रीय लोकशाही आघाडी आपली सत्ता कायम राखण्यासाठी प्रयत्नशील आहे, तर विरोधक सत्तांतर घडवून आणण्यासाठी सक्रिय झाले आहेत. स्थानिक प्रश्न, रोजगार आणि पर्यटन विकास हे येथील प्रमुख मुद्दे ठरले आहेत. या निवडणूक फेरीचे राष्ट्रीय महत्त्व विशेष अधोरेखित होते, कारण या पाचही प्रदेशांमधून लोकसभेच्या सुमारे 116 जागा येतात, ज्या एकंदर लोकसभा जागांच्या मोठ्या भागाचे प्रतिनिधित्व करतात. त्यामुळे या राज्यांतील जनमताचा कल भविष्यातील लोकसभा निवडणुकांवरही प्रभाव टाकू शकतो. विशेषतः पश्चिम बंगालमधील मतदारसूची पुनरावलोकन प्रक्रियेवरून निर्माण झालेला वाद आणि त्यावरून झालेली राजकीय चढाओढ ही या निवडणुकीची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली आहेत.

एकंदरीत, ही निवडणूक फेरी केवळ सत्तेची लढाई नसून विविध पक्षांच्या संघटनशक्तीची, नेतृत्वाची आणि जनतेच्या अपेक्षांची कसोटी आहे. मतदार विकास, स्थिरता आणि पारदर्शक प्रशासन या मुद्द्यांवर कोणाला पसंती देतात, यावर या निवडणुकांचे निकाल अवलंबून असतील. त्यामुळे येत्या मतदानानंतर केवळ संबंधित राज्यांचेच नव्हे तर देशाच्या राजकीय दिशेचे चित्र अधिक स्पष्ट होईल, असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

प्रासंगिक »

अतिरेक नको

एकदा एक राजहंस एका बगळ्यास म्हणाला, 'काय रे तू आधाशी ! पाण्यातला कोणताही प्राणी खायला तू मागेपुढे पहात नाहीस. बरं-वाईट, नासकं हा फरकसुद्धा तुझ्या खादाड जिभेला समजत नाही.

माझं पहा, मी फक्त पूर्ण उमललेल्या कमळातले तंतु तेवढे खाईन, दुसरा कसलाही पदार्थ माझ्या घशाखाली जाणार नाही.' त्यावर बगळा म्हणाला, 'माझ्या दृष्टीने असा चोखंदळपणा असणं बरं नव्हे. ज्या वेळी जे मिळेल ते खावं अन् सुखी राहावं. खाण्याचा पदार्थ दिसला की तो खावा हेच शहाणपणाचं. असे म्हणून बगळा उडाला व जवळच्या तलावाकाठी गेला. तेथे कडेला एक मासा दिसला. तेव्हा विचार न करता त्याने तो एकदम गिळला, पण आत असलेला गळ घशाला लागून तो जिवास मुकला. राजहंस आपले आवडते खाणे दुसऱ्या कमळे असलेल्या तळ्यात गेला, पण तेथे हंस धरण्यासाठी जाळे लावले होते, त्यात तो सापडला.

- तात्पर्य :
कोणत्याही गोष्टीचा अतिरेक नको.

'युद्धस्य कथा रम्य:' असे म्हटले जाते. युद्धाच्या कथा ऐकायला किंवा पाहायला कदाचित आकर्षक वाटतात; परंतु प्रत्यक्षात युद्धाचे परिणाम अत्यंत भीषण आणि विनाशकारी असतात. महाभारतात संजयने धृतराष्ट्राला युद्धभूमीवरील प्रत्येक घडामोड सांगितली होती.

या ट्रम्पला आवरा!



आजच्या आधुनिक काळातही आपण दूरचित्रवाणी, इंटरनेट आणि सामाजिक माध्यमांमधून जगातील युद्धस्थितीचे थेट चित्र पाहत आहोत. मात्र या बातम्यांमागे असलेली मानवी वेदना, आर्थिक हानी आणि पर्यावरणीय संकट यांची तीव्रता अधिक गंभीर आहे. सध्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांमुळे निर्माण झालेली युद्धस्थिती ही जागतिक चिंतेचा विषय बनली आहे.

इराणविरुद्ध सुरू असलेल्या संघर्षामुळे केवळ संबंधित राष्ट्रांनाच नव्हे, तर संपूर्ण जगाला त्याची झळ बसत आहे. इंधनाचे दर वाढणे, पुरवठा साखळी विस्कळीत होणे आणि महागाई वाढणे या समस्या अनेक देशांसमोर उभ्या राहिल्या आहेत. विकसनशील आणि गरीब राष्ट्रे या परिस्थितीत सर्वाधिक भरडली जात आहेत. ऊर्जा संकटामुळे उद्योगधंदे मंदावले असून बेरोजगारी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे. काही आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी मोठ्या प्रमाणावर कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केल्याच्या घटना समोर येत आहेत, ज्याचा परिणाम हजारो कुटुंबांवर होत आहे.

या युद्धामुळे पर्यावरणावरही गंभीर परिणाम होत आहेत. सतत होणारे बॉम्बहल्ले, तेलसाठ्यांचे नुकसान आणि प्रदूषण यामुळे जागतिक पर्यावरणीय संतुलन धोक्यात आले आहे. हवामान बदलाच्या संकटाशी झुंज देणाऱ्या जगासाठी ही परिस्थिती अधिक धोकादायक ठरू शकते. युद्धामुळे निर्माण होणाऱ्या धूर, रासायनिक घटक आणि विनाशामुळे नैसर्गिक संसाधनांची मोठ्या प्रमाणात हानी होत आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक राष्ट्रांनी या संघर्षाबाबत चिंता व्यक्त केली असून शांततापूर्ण तोडगा काढण्याची मागणी केली आहे. काही देशांनी युद्धाला पाठिंबा देण्यास नकार दिला आहे, तर काही राष्ट्रे मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा परिस्थितीत आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि संवाद यांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. युद्ध हा कोणत्याही समस्येचा कायमस्वरूपी उपाय ठरू शकत नाही, हे इतिहासाने अनेकदा सिद्ध केले आहे.

एकंदरीत, सध्याची परिस्थिती पाहता युद्धाची तीव्रता कमी करून शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडवणे ही काळाची गरज आहे. जागतिक नेत्यांनी संयम, संवाद आणि मुत्सद्देगिरी यांचा अवलंब करून मानवतेचे रक्षण करण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे. अन्यथा युद्धाची किंमत संपूर्ण जगाला मोजावी लागेल आणि त्याचे परिणाम पुढील पिढ्यांनाही भोगावे लागतील. त्यामुळे युद्धाला आळा घालणे आणि शांततेचा मार्ग स्वीकारणे हाच सर्वांसाठी हिताचा मार्ग ठरेल.

।। अभंगवाणी ।।

देव सर्वाठायीं वसे ।
परि न दिसे अभाविकां ॥१॥

जळीं स्थळीं पाषाणीं भरला ।
रिता ठाव कोठें उरला ॥२॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

राहुरी पोटनिवडणुकीत उमेदवारीवरून महाविकास आघाडीत तणाव

काँग्रेसचा उमेदवार देण्याचा ठाम निर्णय; ठाकरे गटही लढतीवर ठाम

महाईन्यूज । अहिल्यानगर

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत उमेदवारीवरून तणाव निर्माण होण्याची चिन्हे दिसत आहेत. काँग्रेसचे नेते बाळासाहेब थोरात यांनी काँग्रेसकडून उमेदवार दिला जाईल, असा ठाम दावा केला आहे. तर शिवसेनेच्या ठाकरे गटाचे जिल्हा संघटक रावसाहेब खेवरे यांनी कोणत्याही परिस्थितीत निवडणूक लढवणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

सोमवारी (६ एप्रिल) उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असताना या घडामोडींना वेग आला आहे. खेवरे यांनी थोरात यांची भेट घेऊन उमेदवारीबाबत भूमिका स्पष्ट केली असून, याबाबत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनाही माहिती दिल्याचे सांगितले आहे. थोरात यांनी यावर ठाकरे यांच्याशी चर्चा करून निर्णय घेऊ, असे म्हटले आहे.

दरम्यान, भाजपने दिवंगत आमदार शिवाजी कर्डिले यांचे पुत्र अक्षय कर्डिले यांना उमेदवारी जाहीर केली आहे. दुसरीकडे, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे माजी आमदार प्राजक्त तनपुरे यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला असला तरी ते अपक्ष म्हणून रिंगणात उतरण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.

तनपुरे यांनी मतदारसंघात काढलेल्या यात्रेदरम्यान पक्षाचे चिन्ह न वापरणे, तसेच भगवी वेशभूषा परिधान करणे यामुळे त्यांच्या भूमिकेबाबत तर्क-वितर्क लावले जात आहेत. त्यांच्या समर्थकांकडून अपक्ष उमेदवारीची शक्यता व्यक्त केली जात आहे.

काँग्रेसकडून वकील अथर्व म्हसे यांचे नाव पुढे येत असून त्यांनी थोरात यांची भेट घेतली आहे. मात्र ठाकरे गटाकडून खेवरे यांची दावेदारी ठाम असल्याने उमेदवारीवरून वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राहुरी व बारामती पोटनिवडणुका बिनविरोध करण्यासाठी प्रयत्न होणार असल्याचे म्हटले होते. मात्र सध्याच्या परिस्थितीत राहुरीची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी होताना दिसत आहे. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत ९ एप्रिलपर्यंत असल्याने शेवटच्या क्षणीही राजकीय घडामोडींना वेग येण्याची शक्यता आहे.

हत्या कटाचा आरोप; बच्चू कडूंवर गंभीर आरोप

महाईन्यूज । पुणे

राज्याच्या राजकारणात नेहमीच चर्चेत राहणारे माजी मंत्री आणि प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख बच्चू कडू यांच्या अडचणीत वाढ झाली आहे. भाजप आमदार प्रवीण तायडे यांनी बच्चू कडू यांच्यावर आपल्या भावाच्या हत्येचा कट रचल्याचा गंभीर आरोप केल्याने अमरावतीसह संपूर्ण महाराष्ट्रात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, या खुनाच्या कटाचे 'ऑडिओ रेकॉर्डिंग' आपल्याकडे असल्याचा दावा तायडे यांनी केला आहे.

माजी मंत्री बच्चू कडू यांच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर आमदार प्रवीण तायडे यांनी माध्यमांशी बोलताना स्फोटक माहिती दिली. तायडे यांच्या मते, निवडणुकीतील पराभव बच्चू कडू यांच्या जिव्हारी लागला आहे. याच पराभवाचा बदला घेण्यासाठी त्यांनी तायडे यांच्या भावाविरोधात खुनाचे षडयंत्र रचले आहे. "माझ्या भावाच्या हत्येचा कट कसा रचला गेला, याची संपूर्ण ऑडिओ क्लिप माझ्याकडे आहे," असा दावा तायडे यांनी केला. "पराभव पचवणे बच्चू कडू यांना कठीण जात आहे. त्यामुळेच ते माझ्या आणि माझ्या कुटुंबाविरोधात अशा प्रकारचे टोकाचे पाऊल उचलत आहेत. यापूर्वीही त्यांनी अशा प्रकारे कोणाविरोधात कट रचला आहे का, याची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे." तायडे यांनी या प्रकरणाचा तपास पोलिसांनी गांभीर्याने करावा, अशी मागणी केली आहे. या ऑडिओ क्लिपच्या दाव्यामुळे बच्चू कडू यांच्याभोवती संशयाचे जाळे निर्माण झाले आहे. "हा प्रकार अत्यंत गंभीर असून बच्चू कडू यांना तात्काळ अटक करावी," अशी मागणी आमदार तायडे यांनी केली आहे. या आरोपामुळे अमरावती जिल्ह्यातील राजकीय वातावरण तापले आहे. प्रवीण तायडे यांच्याकडे असलेली ती ऑडिओ क्लिप नेमकी काय आहे? त्यामध्ये कोणाचे आवाज आहेत? आणि पोलिसांनी यावर काय पाऊल उचलले आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

५ वर्षे पोलिसांना चकवणारा बलात्कार आरोपी अखेर जाळ्यात

महाईन्यूज । चंद्रपूर

मागील पाच वर्षांपासून पोलिसांना गुंगारा देणाऱ्या बलात्काराच्या आरोपीला अखेर सावली पोलिसांनी गुरुवारी (दि. २ एप्रिल) अटक केली. साईनाथ श्यामराव वासेकर (४०, रा. पिपरी देशपांडे, ता. पोंभुर्णा) असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. या कारवाईमुळे परिसरात पोलिसांच्या सतर्कतेचे कौतुक होत आहे.

सन २०१६ मध्ये सावली पोलिस स्टेशनच्या हद्दीत बलात्काराचे प्रकरण घडले होते. या प्रकरणी साईनाथवर कलम ३७६ (२), (आय), ५०६ भादंविनुसार गुन्हा नोंदविण्यात आला होता. सुरुवातीला काही दिवस तो न्यायालयीन तारखेला हजर राहिला; मात्र, त्यानंतर मागील पाच वर्षांपासून तो पोलिसांना सतत गुंगारा देत होता. पोलिस त्याच्या मागावर होतेच; पण, तो वारंवार आपली ठिकाणे बदलत होता. दरम्यान, साईनाथ हा मागील १५ दिवसांपासून मूल तालुक्यातील आकापूर येथे नाव बदलून गुप्तपणे भाड्याने खोली घेऊन राहत असल्याची माहिती सावली पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच त्यांनी तातडीने पथक तयार करून कारवाईचे आदेश दिले.

जंगलात 'सर्च ऑपरेशन'

आरोपी घनदाट जंगलात शिरल्याने पोलिसांनी परिसराची नाकेबंदी केली. अतिरिक्त मदतीसाठी तीन पोलिस हवालदार आणि सहा पोलिस अंमलदार घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी संपूर्ण जंगलाला घेराव घालून जवळपास दोन किलोमीटरचा परिसर पिंजून काढला. अखेर शिताफीने लपून बसलेल्या साईनाथच्या मुसक्या आवळल्या. ही कारवाई पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे, एसडीपीओ सत्यजीत आमले यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक प्रदीप पुल्लुरवार, पीएसआय सचिन मुसळे, पो.हवा. मट्टामी, पो.हवा. शुक्ला, पोलिस अंमलदार धीरज पिदुरकर व सावली पोलिसांच्या चमूने केली.

नदीच्या पात्रातून पलायन अन् थरार...

ठाणेदार प्रदीप पुल्लुरवार, पीएसआय सचिन मुसळे यांच्या मार्गदर्शनात पो.हवा. मट्टामी, पो.हवा. शुक्ला, पोलिस अंमलदार धीरज पिदुरकर यांची चमू आकापूर येथे पोहोचली. मात्र, पोलिसांची चाहूल लागताच साईनाथने उमा नदीच्या पात्रात उडी घेतली आणि झाडाझुडपांचा आश्रय घेत जंगलाच्या दिशेने धूम ठोकली. आरोपी निसटण्याची शक्यता वाटल्याने पोलिसांनी तातडीने सावली पोलिस ठाण्यातून अतिरिक्त कुमक बोलावली.

ट्रम्प यांच्या धमकीनंतर इराणचा इशारा; 'आखातातील अमेरिकी कंपन्या लक्ष्यावर'

युद्धविराम चर्चांदरम्यान संघर्ष आणखी भडकण्याची शक्यता

महाईन्यूज । अमेरिका

अमेरिका-इराण युद्ध अद्यापही सुरू आहे. या युद्धाचा अनेक देशांवर मोठा परिणाम होत आहे. मात्र, तरीही युद्ध थांबण्याची चिन्ह दिसत नाहीत. अमेरिका-इराण युद्ध कधी थांबणार? की हे युद्ध आणखी भडकणार? याबाबत आता संभ्रमाचं वातावरण निर्माण झालं आहे. कारण एकीकडे युद्धविरामाच्या प्रस्तावावर चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दररोज वेगवेगळे वक्तव्य करून इराणला धमकीवजा इशारा देत आहेत.

यातच आज अमेरिकेने इराणची राजधानी तेहरानला पश्चिमेकडील करज शहराशी जोडणाऱ्या एका महामार्गावरील एका मोठ्या पुलावर भीषण हल्ला केला. या हल्ल्याचा व्हिडीओही ट्रम्प यांनी ट्रुथ सोशल मीडियावरून शेअर केला आहे. तसेच याआधी अमेरिकेने इराणमधील पॉवर प्लांट उडवण्याची धमकीही दिली होती. अमेरिकेच्या या हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर आणि ट्रम्प यांच्या धमकीनंतर आता इराणने अमेरिकेला मोठा इशारा दिला आहे. 'आखातातल्या सगळ्या अमेरिकी कंपन्या जमीनदोस्त करू', असा इशारा इराणी सैन्यांनी अमेरिकेला दिला.

इराणी सैन्यांनी काय इशारा दिला?

"आखातातील सर्व आयसीटी (ICT) कंपन्या अजूनही लक्ष्य आहेत. जर अमेरिकेने इराणच्या वीज प्रकल्पांसंबंधीच्या धमक्यांची अंमलबजावणी केली, तर आम्ही देखील प्रत्युत्तर देऊ. यामध्ये झिओनिस्ट राजवटचे सर्व वीज प्रकल्प, ऊर्जा, पायाभूत सुविधा आणि माहिती व दळणवळण तंत्रज्ञान, तसेच या आखातातल्या अमेरिकन भागधारक असलेल्या सर्व कंपन्यांचा संपूर्ण नायनाट केला जाईल. आमच्या नजरेपासून काहीही लपलेलं नाही", असा इशारा इराणच्या खतम अल-अंबिया मुख्यालयाच्या प्रवक्त्याने एका व्हिडीओ संदेशाच्या माध्यमातून दिला.

३ वर्षांची शिक्षा; काँग्रेस आमदार राजेंद्र भारती यांची सदस्यत्व रद्द

महाईन्यूज । मध्यप्रदेश

दिल्लीतील एमपी-एमएलए न्यायालयाने २७ वर्षांपूर्वीच्या बँक मुदत ठेव प्रकरणात काँग्रेसचे मध्य प्रदेशातील आमदार राजेंद्र भारती यांना दोषी ठरवत तीन वर्षांच्या तुरुंगवासाची शिक्षा सुनावली. या निर्णयानंतर मध्य प्रदेश विधानसभा सचिवालयाने तत्काळ त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याची अधिसूचना जारी केली.

दतिया मतदारसंघाचे आमदार असलेल्या भारती यांचे सदस्यत्व गुरुवारी मध्यरात्री रद्द करण्यात आले असून याबाबत केंद्रीय निवडणूक आयोगालाही माहिती देण्यात आली आहे. हे प्रकरण १९९८ मधील असून, भारती यांच्या आई सावित्री श्याम यांनी दतिया सहकारी ग्रामीण विकास बँकेत १० लाख रुपयांची मुदत ठेव केली होती. १९९८ ते २००१ या कालावधीत बँकेच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष असलेल्या भारती यांनी सहआरोपी लिपिक रघुवीर प्रजापती यांच्यासोबत संगनमत करून नोंदींमध्ये फेरफार केल्याचा आरोप सिद्ध झाला. मुदत ठेवीचा कालावधी तीन वर्षांऐवजी १५ वर्षे दाखवून १९९९ ते २०११ या काळात सुमारे १३.५ टक्के व्याजदराने पैसे काढण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले.

न्यायालयाने गुरुवारी रात्री १२.४३ वाजता निकाल जाहीर करत भारती यांना दोषी ठरवले. त्यांना ६० दिवसांची मुदत देत शिक्षेवर तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे. या प्रकरणात सहआरोपी रघुवीर प्रजापतीलाही दोषी ठरवण्यात आले आहे.

पीओकेवर मोठं वक्तव्य; लवकरच भारतात विलीन होणार?

महाईन्यूज । श्रीनगर

पाकव्याप्त काश्मीर लवकरच भारतात समाविष्ट होईल असं विधान ऑल इंडिया इमाम ऑर्गनाइजेशनचे मुख्य इमाम उमर अहमद इलियासी यांनी केले आहे. त्यासोबतच कलम ३७० हटवल्यानंतर जम्मू काश्मीरमध्ये झालेल्या बदलांचेही त्यांनी कौतुक केले.

उमर अहमद इलियासी यांनी म्हटलं की, आज काश्मीर इथं उभं राहून शेजारील राष्ट्राला एकच सांगतो, पाकव्याप्त काश्मीर भारताचा अविभाज्य घटक आहे. निश्चितपणे ते भारतात पुन्हा समाविष्ट होईल. पीओकेतील लोकांची जनमत चाचणी करायला हवी. तिथल्या लोकांना भारतासोबत यायचे आहे. ते जम्मू काश्मीरमध्ये होत असलेला विकास पाहताहेत. जर वरंच्यांनी ठरवले तर लवकरच या लोकांची घरवापसी होईल. आज काश्मीर ज्यारितीने पुढे जात आहे ते पाहता पीओके लवकरच भारतातात येईल अशी भविष्यवाणीच त्यांनी केली. तसेच बदलेलं काश्मीर पाहून मला आनंद होतो. हे एक नवीन काश्मीर आहे. आज काश्मीर सुधारले आहे. इथे प्रत्येक ठिकाणी समृद्धी आणि पर्यटन वाढले आहे. इथले लोक प्रगत झालेत. एक काळ होता जेव्हा इथले युवा आणि लहान मुले दगडफेक करायचे परंतु आज त्या मुलांच्या हातात पुस्तक आले आहे. ते शिक्षण घेत आहेत. पहलगाम हल्ल्यानंतर पर्यटनात काही काळ घसरण झाली होती. मात्र आता पर्यटकांनी पुन्हा काश्मीरला यायला हवे. इथे दहशतीचे वातावरण नाही. युद्धातून विध्वंस येतो, त्यामुळे संपूर्ण जगात शांतता राहावी असंही उमर अहमद इलियासी यांनी म्हटलं.

जाणून घ्या कोण आहेत उमर अहमद इलियासी?

उमर अहमद इलियासी ऑल इंडिया इमाम ऑर्गनाइजेशनचे मुख्य इमाम आहेत. त्यांनी पंजाबच्या भगत युनिवर्सिटीतून पीएचडी पदवी घेतली आहे. स्वतंत्र भारताच्या इतिहासात पहिल्यांदाच एखाद्या मशिदीतील इमामाने इतकी मोठी पदवी मिळवली. इलियासी हे निवडक इस्लामी विद्वानांपैकी एक आहेत जे कट्टरता आणि दहशतवादाविरोधात स्पष्ट आणि रोखठोक भूमिका घेतात. २०२२ मध्ये दिल्लीतील कस्तुरबा गांधी मार्गावरील एका मशिदीत आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांची भेट घेतल्यानंतर ते प्रकाशझोतात आले. उमर अहमद इलियासी यांनी तर मोहन भागवत यांना 'राष्ट्रपिता' म्हणून संबोधले होते.

रश्मिकाचा 'एअरपोर्ट लूक' व्हायरल

अभिनेत्री रश्मिका मंदाना पुन्हा एकदा तिच्या 'एअरपोर्ट लूक'मुळे सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे. लग्नानंतर रश्मिका पुन्हा एकदा एअरपोर्टवर दिसली असून तिचे स्टायलिश फोटो सध्या व्हायरल होत आहेत. मात्र यावेळी रश्मिका एकटीच दिसली. त्यामुळे चाहते तिच्याकडे विजय देवरकोंडाबद्दल प्रश्न विचारताना दिसत आहेत. यावेळी तिने हलक्या पिवळ्या रंगाचा रिब्ड क्रॉप टॉप हाय-वेस्ट वाइड-लेग ब्लू जीन्ससोबत पेअर करून आपला लूक अधिक ब्राइट केला. एअरपोर्ट लूक सनग्लासेसशिवाय अपूर्ण मानला जातो आणि रश्मिकानेही तो स्टाइल उत्तमरीत्या कॅरी केला. या आउटफिटसोबत तिने चमकदार मॅरून रंगाचे शूज परिधान केले.

साराने उकलले झोयाच्या आगामी प्रकल्पाचे गूढ

गेल्या काही दिवसांपासून चित्रपटसृष्टीत 'धुरंधर' फेम सारा अर्जुन आणि 'होमबाउंड' अभिनेता ईशान खट्टर यांच्या एकत्र येण्यावरून जोरदार चर्चा रंगली होती. प्रसिद्ध दिग्दर्शिका झोया अख्तर यांच्या मार्गदर्शनाखाली हे दोन्ही कलाकार काहीतरी खास चित्रीत करत असल्याचे व्हिडिओ समाजमाध्यमांवर व्हायरल झाले होते. यामुळे चाहत्यांमध्ये एका नव्या चित्रपटाची उत्सुकता निर्माण झाली होती, मात्र आता या प्रकरणातील सत्य समोर आले आहे. या व्हायरल लिप्समुळे उमटणाऱ्या तर्कवितर्कांना पूर्णविराम देत खुद्द सारा अर्जुनने या प्रकल्पाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. प्रेक्षकांची निराशा होऊ शकते, परंतु हे कलाकार कोणत्याही चित्रपटासाठी नाही तर एका जाहिरातीसाठी एकत्र आले आहेत. साराने स्पष्ट केले की, हे चित्रीकरण 'गूगल एआय'च्या (कृत्रिम बुद्धिमत्ता) एका जाहिरात मोहिमेचा भाग आहे. या तंत्रज्ञानातील प्रगती आणि त्याबद्दल जनसामान्यांमध्ये कुतूहल निर्माण करण्यासाठी या जाहिरातीचे नियोजन करण्यात आले आहे.

१० कोटींचे मानधन !

दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीतील लेडी सुपरस्टार नयनताराची सुपरस्टार सलमान खानच्या आगामी चित्रपटात एंट्री झाली आहे. दिग्दर्शक वामशी पेडिपल्ली यांच्या चित्रपटात दोघेही पहिल्यांदाच एकत्र काम करणार आहेत. हा एक पॅन इंडिया चित्रपट असणार असून, साऊथमधील मोठ्या निर्मात्यांपैकी एक दिल राजू यांची निर्मिती असेल. चित्रपटाची कथा आणि इतर कलाकारांबाबत अद्याप कोणतीही माहिती समोर आलेली नाही. मात्र, सलमान आणि नयनताराच्या मानधनाबाबत एक अपडेट समोर आली आहे. रिपोर्ट्सनुसार, सलमान या चित्रपटासाठी कोणतेही ठराविक मानधन घेणार नाही, तर चित्रपटाच्या नफ्यातील काही टक्के हिस्सा घेणार आहेत. दुसरीकडे, मीडिया रिपोर्ट्सनुसार नयनताराला या चित्रपटासाठी १० कोटी रुपये दिले जाणार आहेत.

सर्वांत हॉटेस्ट भूमिकेत कृती

होमी अदजानिया दिग्दर्शित 'कॉकटेल २' या आगामी चित्रपटामुळे कृती सेनॉन सध्या कमालीची चर्चेत आहे. या चित्रपटात तिने साकारलेली भूमिका तिच्या कारकिर्दीतील आजवरची सर्वात हॉटेस्ट भूमिका असल्याचे तिने म्हटले आहे. शाहिद कपूर आणि रश्मिका मंदाना यांच्यासह कृती या चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. एका मुलाखतीदरम्यान कृतीने सांगितले की, 'कॉकटेल २' मधील तिचा लूक तिच्या आधीच्या सर्व भूमिकांपेक्षा पूर्णपणे वेगळा आहे. दिग्दर्शक होमी अदजानिया यांनी तिच्या व्यक्तिमत्त्वातील एक कूल बाजू पडद्यावर आणली आहे, ज्याची तिला स्वतःलाही कल्पना नव्हती. होमी यांची सौंदर्याची आणि दृश्यांची जाण विलक्षण असून, त्यांनी कृतीला एका ग्लॅमरस अवतारात सादर केले आहे. २०१२ मध्ये आलेल्या 'कॉकटेल' चित्रपटाशी या दुसऱ्या भागाचा थेट संबंध नसल्याचे कृतीने स्पष्ट केले आहे. मात्र, दोन्ही चित्रपटांचे 'वाइब' किंवा वातावरण सारखेच असेल. पहिल्या भागाप्रमाणेच यातही दोन मुली आणि एक मुलगा अशी कथा गुंफण्यात आली आहे. भावना, मैत्री, नाट्य, उत्तम संगीत आणि चित्तवेधक लोकेशन्स यांचे मिश्रण या चित्रपटात पाहायला मिळेल, असेही तिने नमूद केले. हा चित्रपट १९ जून २०२६ रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाच्या निमित्ताने शाहिद, कृती आणि रश्मिका ही नवी त्रयी पहिल्यांदाच एकत्र येणार असल्याने प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता आहे.

RCBसाठी खेळताना बोर्डाशी पंगा; नुवान तुषाराचा धाडसी निर्णय...

राजस्थान रॉयल्सचा चेन्नईवर दणदणीत विजय

महाईन्यूज । कोलकाता

आयपीएल २०२६ स्पर्धेला दमदार सुरुवात झाली असून सर्व संघांनी आपापले पहिले सामने पूर्ण केले आहेत. मात्र काही परदेशी खेळाडू अद्याप आपल्या संघात दाखल झालेले नाहीत. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाकडून खेळणाऱ्या श्रीलंकेच्या वेगवान गोलंदाजाला अद्याप भारतात येता आलेले नाही.

श्रीलंका क्रिकेट मंडळाने ना-हरकत प्रमाणपत्र (NOC) देण्यास नकार दिल्याने त्याचा आयपीएलमधील सहभाग अडकला आहे. यामुळे संबंधित खेळाडूने आता कोलंबो जिल्हा न्यायालयात धाव घेत मंडळाला NOC देण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली आहे. या प्रकरणाची सुनावणी ९ एप्रिल रोजी होणार आहे.

दरम्यान, आयपीएलमध्ये खेळण्यासाठी फिटनेस चाचणी उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. संबंधित खेळाडू फिटनेस चाचणीत अपयशी ठरल्याचे कारण देत मंडळाने NOC नाकारल्याची माहिती समोर येत आहे. मात्र खेळाडूने आपल्या फिटनेसवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यास नकार देत यापूर्वी याच फिटनेसच्या आधारे खेळण्याची परवानगी मिळाल्याचे स्पष्ट केले आहे.

विशेष म्हणजे, त्या खेळाडूचा श्रीलंका क्रिकेट मंडळासोबतचा केंद्रीय करार ३१ मार्च रोजी संपला असून तो वाढवण्यात आलेला नाही. तसेच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीचा विचार असल्याची माहितीही त्याने मंडळाला दिली होती. आता हे प्रकरण न्यायालयात गेल्याने क्रिकेट वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

शेरेबाजी महागात; अभिषेक शर्मावर BCCIची कारवाई

महाईन्यूज । कोलकाता

आयपीएलमध्ये गुरुवारी ईडन गार्डनवर झालेल्या लढतीत सनरायझर्स हैदराबादने कोलकाता नाईटरायडर्सवर दणदणीत विजय मिळवला. या लढतीत सलामीवर ट्रॅव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांनी केलेली तुफानी फलंदाजी हे हैदराबादच्या विजयाचं खास वैशिष्ट्य ठरलं. मात्र फलंदाजीत कमाल दाखवणाऱ्या अभिषेक शर्मा याला बोलंदाजी नडली असून, सामना संपल्यानंतर बीसीसीआयने आयपीएलच्या नियमावलीच्या उल्लंघनप्रकरणी त्याला दोषी ठरवत त्याच्यावर कठोर कारवाई केली आहे.

कोलकाता नाईटरायडर्सविरुद्ध झालेल्या या लढतीत अभिषेक शर्माने ४८ धावांची आक्रमक खेळी करत हैदराबादच्या डावाला विस्फोटक सुरुवात करून दिली होती. मात्र सामन्यादरम्यान त्याने मैदानावर केलेलं वर्तन त्याला नडलं असून, त्याच्यावर कारवाई करण्यात आली आहे. याबाबत बीसीसीआयकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार अभिषेक शर्मा याने आयपीएल कोड ऑफ कंडक्ट च्या कलम २.३ चं उल्लंघन केलं आहे. हा नियम अपमानास्पद किंवा अश्लील भाषेच्या वापराशी संबंधित आहे. बीसीसीआयने अभिषेक शर्मावर कारवाई करताना त्याला सामन्यातील एकूण मानधनाच्या २५ टक्के रकमेचा दंड ठोठावला आहे. तसेच त्याच्या खात्यामध्ये एक डिमेरिट पॉईंटही जोडला आहे. अभिषेक शर्मा यानेही त्याच्याकडून झालेली चूक मान्य केली आहे.

दरम्यान, आयपीएलमध्ये गुरुवारी सनरायझर्स हैदराबाद आणि कोलकाता नाईटरायडर्स यांच्यात झालेल्या लढतीत अभिषेक शर्मा, ट्रॅव्हिस हेड, हेन्रिक क्लासेन आणि नितिश रेड्डी यांनी केलेल्या फटकेबाजीच्या जोरावर हैदराबादने २० षटकांमध्ये ८ बाद २२६ धावा फटकावल्या होत्या. या धावसंख्येचा पाठलाक करताना कोलकाता नाईटरायडर्सने जोरदार सुरुवात केली होती. मात्र फलंदाज ठराविक अंतराने बाद होत गेल्यानं त्यांचा संपूर्ण संघ १६१ धावांत गारद झाला होता. हैदराबादने हा सामना ६५ धावांनी जिंकला होता.

BCCIची कडक कारवाई...

आयपीएल सामन्यादरम्यान अपमानास्पद भाषा वापरल्याप्रकरणी अभिषेक शर्मावर बीसीसीआयने कठोर कारवाई केली आहे. आयपीएलच्या आचारसंहितेतील कलम २.३ चे उल्लंघन केल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्याच्यावर सामन्याच्या मानधनाच्या २५ टक्के इतका दंड ठोठावण्यात आला. याशिवाय त्याच्या खात्यात एक डिमेरिट पॉईंटही नोंदवण्यात आला आहे. मैदानावर केलेल्या शेरेबाजीमुळे ही कारवाई करण्यात आल्याचे बीसीसीआयने स्पष्ट केले आहे. दरम्यान, अभिषेक शर्माने आपली चूक मान्य केली असून भविष्यात अशा प्रकारची पुनरावृत्ती होणार नाही, असेही त्याने कबूल केले आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

महाईन्यूज™

epaper.mahaenews.com

ePaper

। शनिवार ।
दि. 04 एप्रिल 2026 ।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

भामा आसखेड पाणी योजनेला जानेवारीचा 'अल्टिमेटम'

भाजपा आमदार महेश लांडगे यांची महत्त्वपूर्ण बैठक

महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचे आश्वासन

महाईन्यूज।
पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड शहरातील वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी याचा विचार करुन भामा आसखेड पाणी योजना पूर्ण क्षमतेने सुरू करण्यासाठी जानेवारी-२०२७ चा 'अल्टिमेटम' महापालिका प्रशासनाला दिलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते निर्धारित वेळेत प्रकल्पाचे लोकार्पण होईल, अशी माहिती भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी दिली.

पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत आमदार महेश लांडगे यांनी आंद्रा, भामा आसखेड पाणी पुरवठा योजनेसंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक घेतली. सत्तारुढ पक्षनेता प्रशांत शितोळे, मुख्य अभियंता प्रमोद ओंबासे, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, कार्यकारी अभियंता दीपक पाटील आदी अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत शहरातील पाण्याच्या उपलब्धतेबाबत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आणि आगामी कामांची तातडीने गती मिळविण्यासाठी उपाययोजना निश्चित केल्या आहेत. या योजेतील भामा आसखेड जलउपसा केंद्रावर काम प्रगतीवर आहे. जॅकवेल – १००% पूर्ण झाले आहे. पंप हाऊस – ७५%, सबस्टेशन – ८०%, अप्रोच ब्रिज –५% आणि विद्युत, यांत्रिकी, Instrumentation, SCADA साहित्य – १००% उपलब्ध झाले आहेत.

"पिंपरी-चिंचवडच्या पाणी पुरवठा प्रकल्पासाठी महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागातील अनुभवी अधिकारी आणि महापालिका अस्थापनेवर असणारा अधिकारी भूसंपादन व विविध परवानग्यांसाठी पूर्णवेळ नियुक्त केला पाहिजे. तशी सूचना प्रशासनाला केली आहे. आंद्रा-भामा आसखेड पाणी योजना पिंपरी-चिंचवडसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. जानेवारी- २०२७ मध्ये कोणत्याही परिस्थितीत पूर्ण क्षमतेने योजना सुरू होईल. या करिता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली पाठपुरावा करीत आहोत.

- महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

रावेत आणि निघोजे बंधारा प्रदूषणावर उपायोजना करा

शहराला पाणी उपसा करणाऱ्या दोन्ही बंधाऱ्यातील पाणी प्रदूषणाची समस्या गंभीर बनली आहे. याबाबत आपण विधानसभा सभागृहातही मंत्रीमहोदय यांचे लक्ष वेधले आहे. पुरवठा होणारे पाणी प्रदूषित असल्यामुळे त्यावर प्रक्रिया करण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची पाणी प्रक्रिया यंत्रणा निर्माण करण्याची आवश्यकता आहे. सेकंडरी ट्रिटमेंटनंतर आता टर्शरी ट्रिटमेंट करावी लागणार आहे. त्याठिकाणी ड्रेनेजचा वास येतो. त्यासाठी तातडीने निर्णय घ्यावा. तसेच, निगडी ऑग्युमेंन्टेशन टप्पा दोनचे काम सुरू करण्याची आवश्यकता आहे. निगडी WTP - ४२८ MLD (१०० MLD वाढ, एकूण ५२८ MLD) कामाला गती द्यावी, अशी सूचना आमदार लांडगे यांनी केली.

ठेकेदार बदला किंवा नवीन घ्या, पण काम वेळेतच झाले पाहिजे

भामा आसखेड धरण येथील अशुद्ध जलउपसा केंद्र पासून नवलाख उंबरे येथील बी.पी.टी पर्यंत १७०० मि.मी जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू आहे. या कामाचा ठेकेदार - मे. ऑफशोर इन्फ्रास्ट्रक्चर लि. यांनी दिलेल्या मुदतीमध्ये काम केलेले नाही. तत्कालीन आयुक्त श्रावण हर्डिकर यांनी सदर ठेकेदाराचे काम रद्द केले आहे. नवीन निविदा काढणे किंवा न काढणे हा प्रशासनाचा अधिकार आहे. पण, या प्रकल्पाचे काम निश्चित वेळेत झाले पाहिजे. त्यासाठी संबंधित ठेकेदार याला जाचक अटी आणि दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असे नमूद करा. भामा आसखेड प्रकल्पातून सप्टेंबर- ऑक्टोबरपर्यंत ट्रायल चालू झाली पाहिजे. पूर्ण क्षमतेने प्रकल्प चालू करुन जानेवारी २०२७ मध्ये मुख्यमंत्री महोदय यांच्याहस्ते लोकार्पण झाले पाहिजे, अशी सूचनाही आमदार लांडगे यांनी केली.

पिंपळे सौदागरला मिळणार स्वतंत्र पोलीस ठाणे!

आमदार शंकर जगताप, शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या पाठपुराव्याला यश

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

वेगाने विकसित होत असलेल्या पिंपळे सौदागर परिसरासाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी समोर आली आहे. पिंपळे सौदागर येथे स्वतंत्र पोलीस ठाणे उभारण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, पोलीस आयुक्तालयाने याबाबतचा अधिकृत प्रस्ताव राज्य शासनाकडे सादर केला आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांची अनेक वर्षांपासूनची मागणी पूर्णत्वास येण्याच्या मार्गावर आहे.

"पिंपळे सौदागरचा झपाट्याने विकास होत असताना नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे आवश्यक होते. वाढती लोकसंख्या लक्षात घेता स्वतंत्र पोलीस ठाण्याची गरज होती. आमदार शंकरशेठ जगताप यांच्या सहकार्याने केलेल्या पाठपुराव्याला यश आले, ही आनंदाची बाब आहे. या निर्णयामुळे परिसरातील महिला, ज्येष्ठ नागरिक आणि व्यावसायिक अधिक सुरक्षिततेचा अनुभव घेतील.

- शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष तथा नगरसेवक, भाजपा.

या मागणीसाठी भाजपा आमदार शंकर जगताप आणि भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी सातत्याने पाठपुरावा केला होता. प्रशासकीय पातळीवर बैठका, निवेदने आणि गृह विभागाशी थेट संवाद साधत त्यांनी हा विषय प्राधान्याने मांडला. त्यांच्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून, प्रस्तावाला गती मिळाल्याने स्थानिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे. यासाठी नगरसेविका अनिताताई काटे आणि कुंदाताई भिसे यांनीही सकारात्मक भूमिका बजावली. वाढत्या शहराला सुरक्षा कवचाची गरज पिंपळे सौदागर हा परिसर आयटी हब आणि आधुनिक निवासी भाग म्हणून झपाट्याने विकसित होत आहे. मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या, शैक्षणिक संस्था आणि वाढती लोकसंख्या यामुळे येथे कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी अधिक वाढली आहे. सध्या या भागाला जवळच्या पोलीस ठाण्यांवर अवलंबून राहावे लागत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत पोलिसांना घटनास्थळी पोहोचण्यास विलंब होत होता. ही बाब लक्षात घेऊन स्वतंत्र पोलीस ठाण्याची मागणी जोर धरत होती.

नवीन 'परिमंडळ ४' चा प्रस्तावही

या प्रस्तावात केवळ पोलीस ठाण्याचाच समावेश नसून, प्रशासकीय सुलभतेसाठी 'परिमंडळ ४' निर्माण करण्याचाही विचार करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण परिसरातील पोलीस यंत्रणा अधिक कार्यक्षम होण्यास मदत होणार आहे.

नागरिकांना होणारे फायदे

स्वतंत्र पोलीस ठाण्यामुळे पिंपळे सौदागरमध्ये पोलिसांची उपस्थिती वाढणार असून, गस्त अधिक नियमित होईल. तक्रारींवर त्वरित प्रतिसाद मिळाल्याने चेन स्नॅचिंग, घरफोडी आणि वाहतूक कोंडीसारख्या समस्यांवर प्रभावी नियंत्रण मिळवता येईल. तसेच नागरिकांना पोलीस कामांसाठी लांब अंतरावर जाण्याची गरज भासणार नाही.

लोकसहभाग हीच शहर विकासाची ताकद; महापौर रवि लांडगे

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

लोकसहभागातून उभे राहणारे उपक्रम हीच शहर विकासाची खरी ताकद आहे. निगडी परिसरातील नागरिक आणि महानगरपालिका यांच्या संयुक्त प्रयत्नातून तयार झालेला ऑक्सिजन पार्क हा एक अनोखा आदर्श असा पर्यावरणपूरक उपक्रम आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी निगडी प्राधिकरण येथील ऑक्सिजन पार्कच्या उद्घाटन प्रसंगी केले.

"वाढत्या शहरीकरणाच्या पार्श्वभूमीवर हरित क्षेत्रांचे जतन व संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांच्या सहभागातून साकारलेला हा प्रकल्प पर्यावरण संतुलन राखण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरेल आणि हरित शहराच्या संकल्पनेला बळ देईल.

– डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

"पिंपरी चिंचवड शहरातील प्रत्येक प्रभागात हरित क्षेत्र वाढावे, यासाठी प्रशासन आणि नागरिक एकत्र येत आहेत. लोकसहभागातून साकारलेले ऑक्सिजन पार्क हे भावी पिढ्यांसाठी मौल्यवान ठेवा आहे.

– शर्मिला बाबर, उपमहापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.

निगडी प्राधिकरण येथील सेक्टर २६ मध्ये स्थानिक रहिवासी आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या सहभागातून विकसित करण्यात आलेल्या ऑक्सिजन पार्कचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहात पार पडले, त्यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास आमदार अमित गोरखे, उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसदस्या शैलजा मोरे, अनुराधा गोरखे, नगरसदस्य अमित गावडे यांच्यासह महापालिका मुख्य उद्यान अधीक्षक महेश गारगोटे, कार्यकारी अभियंता सुनील पवार, दिलीप भोसले, जयकुमार गुजर, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, तसेच राजेंद्र बाबर, विजय नाईक, धनंजय शेडबाळे,सुर्यकांत मुथियान व ऑक्सिजन पार्क उभारण्यात सक्रिय सहभाग नोंदविणारे परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले की, पर्यावरण संवर्धन ही सामूहिक जबाबदारी असून अशा हरित प्रकल्पांमुळे पिंपरी चिंचवड शहर हे अधिक आरोग्यदायी आणि सुंदर बनेल. तसेच शहरातील २०३ उद्यानांपैकी २५ ते ३० उद्यानांमध्ये अशी संकल्पना लोकसहभागातून राबविण्यात येईल, असेही त्यांनी बोलताना सांगितले. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तसेच 'माझी वसुंधरा' शपथ घेऊन पर्यावरण संवर्धनाचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

माझी वसुंधरा शपथ

आम्ही भारताचे सुजाण नागरिक म्हणून शपथ घेतो की,आम्ही भारतमातेला आणि या वसुंधरेला स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी प्रयत्न करू, या वसुंधरेला आणि पर्यावरणाला आमच्याकडून कोणतीही हानी होणार नाही, याची आम्ही दक्षता घेऊ. आम्ही या देशाला सुजलाम् सुफलाम् करण्यासाठी कटिबद्ध राहू आणि आमच्याकडून पर्यावरणाला त्रास होईल असे कोणतेही काम आम्ही करणार नाही. जास्तीत जास्त झाडे लावून या देशाला आणि वसुंधरेला स्वच्छ, सुंदर, हरित आणि प्रदूषणमुक्त करण्यासाठी प्रयत्न करू, अशी शपथ यावेळी उपस्थितांनी घेतली. शपथेचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

डिजिटल जनसंवाद ही काळाची गरज

‘व्हॉईस ऑफ पीएमआरडीए’ ई-न्यूजलेटरचे शानदार प्रकाशन

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) कामकाज अधिक पारदर्शक करण्यासाठी आणि नागरिकांशी थेट संवाद साधण्यासाठी ‘व्हॉईस ऑफ पीएमआरडीए’ या डिजिटल ई-न्यूजलेटरचा गुरुवारी (दि. २ एप्रिल) शानदार शुभारंभ करण्यात आला. “बदलत्या तांत्रिक युगात डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून जनतेशी जोडले जाणे, ही काळाची गरज आहे,” असे प्रतिपादन महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी यावेळी केले.

आकुर्डी येथील पीएमआरडीए मुख्यालयातील छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात हा प्रकाशन सोहळा पार पडला. यावेळी सहआयुक्त (प्रशासन) रूपाली आवले-डंबे, मुख्य अभियंता रिनाज पठाण, सहआयुक्त (जमीन व मालमत्ता) पूनम मेहता, उपायुक्त हिंमत खराडे, विकास परवानगी विभागाचे संचालक अविनाश पाटील, वित्तीय नियंत्रक जितेंद्र कोळंबे, मुख्य अभियंता शिवप्रसाद बागडी, अग्निशमन विभागाचे प्रमुख देवेंद्र पोटफाडे, उपायुक्त (प्रशासन) राजेश माशेरे, तहसीलदार अभिजित जगताप यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

पीएमआरडीएचे धोरणात्मक निर्णय, राबविण्यात येणारे विविध प्रकल्प आणि विकासकामांची अधिकृत माहिती नागरिकांपर्यंत त्वरित पोहोचावी यासाठी हे ई-न्यूजलेटर महत्त्वाचे माध्यम ठरेल. या उपक्रमामुळे पीएमआरडीएच्या कामात अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता येईल, असा विश्वास महानगर आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना पीएमआरडीएच्या सहआयुक्त (प्रशासन) रूपाली आवले-डंबे यांनी या उपक्रमाची भूमिका विशद केली. पीएमआरडीएच्या योजना आणि जनहितार्थ निर्णय थेट सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी हे डिजिटल व्यासपीठ कार्यान्वित करण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. माहिती व जनसंपर्क अधिकारी पुरुषोत्तम सांगळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

आळंदी दुहेरी हत्याकांडाचा काही तासात उलगडा

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

आळंदी परिसरात घडलेल्या दुहेरी हत्याकांडाचा पोलिसांनी अवघ्या काही तासांत उलगडा करत आरोपीला अटक केली आहे.या प्रकरणी विनायक तुकाराम भवारी (वय ३५, रा.सिन्नर, जि.नाशिक) याला पोलिसांनी अटक केली असून तो सध्या पोलिसांच्या ताब्यात आहे.

केळगाव येथील ठाकरवाडी परिसरात गरुवारी मध्यरात्री ही धक्कादायक घटना घडली. संगीता दत्तात्रय गवारी या नेहमीप्रमाणे हॉस्पिटलमध्ये रात्रीच्या पाळीसाठी गेल्या होत्या. त्यांच्या घरी सहा वर्षाची नात धनश्री सोनु केदारी आणि तिची देखभाल करणाऱ्या ७९ वर्षीय मंगल शिंदे य दोघीच होत्या. याच संधीचा फायदा घेत आरोपीने घरात प्रवेश केला. गाढ झोपेत असलेल्या धनश्रीचा गळा आवळून खून करण्यात आला, तर मंगल शिंदे यांच्या डोक्यावर गंभीर वार करून त्यांची निर्घण हत्या करण्यात आली.

गुरुवारी सकाळी संगीता गवारी घरी परतल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला. घरातील भीषण दृश्य पाहन त्यांनी आरडाओरडा केला. त्यानंतर स्थानिक नागरिकांनी तत्काळ पोलिसांना कळवले. घटनास्थळी पोहोचलेल्या आळंदी पोलिसांनी तात्काळ तपास सुरू केला आणि काही तासांतच संशयिताचा माग काढत आरोपी विनायक भवारी याला अटक केली.

पोलीस निरीक्षक एस. बी. नरके यांनी दिलेल्या माहिती नुसार, आरोपी आणि तक्रारदार महिलेचे दोन वर्षापर्वी लग्न झाले होते. मात्र, कौटंबिक वादामुळे ते मागील एक महिन्यापासून वेगळे राहत होते. आरोपी वारंवार घरी येत असल्याने मंगल शिंदे त्याला जाब विचारत असत. तसेच लहानगी धनश्री देखील त्याला विरोध करत होती. याच रागातन आरोपीने प्रथम मंगल शिंदे यांच्यावर हल्ला केला. त्यावेळी धनश्रीने आरडाओरड केल्याने संतापाच्या भरात आरोपीने तिचाही गळा आवळून खून केला.या घटनेने परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

पावसाचा तडाखा; शहरात अनेक ठिकाणी झाडपडी, वाहनांचे नुकसान

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड शहरात गुरुवारी दुपारनंतर झालेल्या मुसळधार पावसासह सोसाट्याच्या वाऱ्यामुळे विविध ठिकाणी आपत्कालीन घटना घडल्या. पिंपरी-चिंचवड महानगरपालिका अग्निशमन दलाच्या नियंत्रण कक्षात दुपारी २.१४ ते सायंकाळी ७.२५ या कालावधीत अनेक घटनांची नोंद झाली.

या कालावधीत एका ठिकाणी इलेक्ट्रिकल डी.पी.ला आग लागल्याची घटना घडली. तसेच शहरातील विविध भागांत झाडे पडण्याच्या एकूण १७ घटना नोंदविण्यात आल्या. रावेत परिसरात सीमाभिंत कोसळल्याचीही एक घटना समोर आली. सुदैवाने या सर्व घटनांमध्ये कोणतीही जीवितहानी किंवा जखमींची नोंद झालेली नाही. मात्र, काही ठिकाणी पार्किंगमध्ये उभी असलेली वाहने झाडाखाली सापडल्याने त्यांचे नुकसान झाले आहे.

दरम्यान, अग्निशमन दलाने तात्काळ हालचाल करत घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी १० अग्निशमन वाहने, २ रेस्क्यू व्हॅन आणि सुमारे ८० जवान तैनात करण्यात आले होते. रात्री उशिरापर्यंत मदत व बचावकार्य सुरू होते. अचानक बदललेल्या हवामानामुळे नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

पावसाळ्यापूर्वीच पाणी साचले

हवामान खात्याने पुणे जिल्ह्यासाठी यलो अलर्ट जाहीर केल्यानंतर आज दुपारनंतर शहरात अवकाळी पावसाने हजेरी लावली. मात्र या पावसामुळे प्रशासनाच्या तयारीचा अभाव पुन्हा एकदा समोर आला. पावसाळ्यापूर्वी नालेसफाई न झाल्याने शहरातील अनेक भागांत पाणी साचल्याचे चित्र दिसून आले. विशेषतः दापोडी परिसरातील भुयारी मार्गात मोठ्या प्रमाणावर पाणी साचल्यामुळे वाहनचालकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. काही ठिकाणी वाहतूक मंदावली तर काही रस्त्यांवर पाणी साचल्याने नागरिकांना पायी चालणेही कठीण झाले. स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाच्या निष्काळजीपणावर नाराजी व्यक्त करण्यात येत असून, दरवर्षी पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची कामे वेळेत पूर्ण करण्याची मागणी होत आहे. अचानक पडणाऱ्या पावसामुळे शहरातील पायाभूत सुविधांची वास्तविक स्थिती समोर येत असून, तातडीने उपाययोजना करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. दरम्यान, आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर महापालिकेने नालेसफाई आणि पाणी निचऱ्याची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

महसूलवाढीच्या बळावर शहराला अधिक सक्षम बनवणार ; महापौर रवि लांडगे

पायाभूत सुविधाव सार्वजनिक सेवांच्या गुणवत्ता सुधारणेवर भर

महाईन्यूज।
पिंपरी-चिंचवड

पिंपरी चिंचवड शहरातील करदात्यांच्या भक्कम सहकार्यामुळे पिंपरी चिंचवड महापालिका विविध विकास प्रकल्प आणि लोकाभिमुख उपक्रम प्रभावीपणे राबवत आहे. आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये शहरातील नागरिकांनी वेळेत कर भरून आपली जबाबदारी सजगपणे पार पाडली, ही बाब महापालिकेसाठी अत्यंत प्रेरणादायी असून मी सर्व करदात्यांचे मनःपूर्वक आभार मानतो. महापालिकेला कराच्या माध्यमातून प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाचा उपयोग नागरिकांच्या कल्याणासाठी आणि शहराच्या सर्वांगीण विकासासाठी करण्यास आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृह येथे पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी महापौर रवि लांडगे बोलत होते.

या पत्रकार परिषदेस विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे, उपआयुक्त सचिन पवार, अण्णा बोदडे, राजेश आगळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच पत्रकार उपस्थित होते.

आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये मालमत्ता कर, पाणीकर, अग्निशमन सेवा शुल्क, झोपडपट्टी सेवाकर, बांधकाम परवानगी शुल्क, आकाशचिन्ह परवाना शुल्क अशा विविध माध्यमातून महसूल वसुलीसाठी सुयोग्य नियोजन करणाऱ्या महापालिकेच्या विविध विभागाचे विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी यांचेही महापौर रवि लांडगे यांनी यावेळी अभिनंदन केले.

महापौर रवि लांडगे म्हणाले, महापालिकेच्या महसूलवाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत असून, ऑनलाईन कर भरणा, सवलत योजना आणि सुलभ सेवा यांमुळे कर वसुलीत लक्षणीय वाढ झाली आहे. करप्रक्रिया अधिक पारदर्शक, सोयीस्कर आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात येत आहे. भविष्यातही करदात्यांचा विश्वास अधिक दृढ करून महसूलवाढ साध्य करण्यासाठी महापालिका सातत्याने प्रयत्नशील राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

महापालिकेच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या पायाभूत सुविधा, स्वच्छता, पाणीपुरवठा, आरोग्य व शिक्षण यांसारख्या अत्यावश्यक सेवांच्या गुणवत्तेत सातत्याने सुधारणा करण्यावर विशेष भर देण्यात येत आहे. आगामी काळातही नागरिकांना अधिक सक्षम व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विविध विकासकामांना गती दिली जाणार असून, शहराला अधिक सुजलाम-सुफलाम आणि स्मार्ट बनविण्याचा महापालिकेचा ठाम संकल्प असल्याचेही महापौर रवि लांडगे यांनी यावेळी नमूद केले.

अग्निशमन विभागाची महसूलात भरारी; १७८.२७ कोटींचे उत्पन्न

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात १७९ कोटी ६९ लाख रुपयांचे उत्पन्न मिळवत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल १६ कोटी ६४ लाखांची वाढ झाली आहे. अग्निसुरक्षा परवाने, इमारतींच्या फायर ऑडिट शुल्क, एनओसी प्रक्रिया तसेच आपत्कालीन सेवांमधून मिळणारे उत्पन्न यामध्ये वाढ झाली आहे. शहरातील वाढती नागरिकरणाची गती लक्षात घेता अग्निशमन विभागाने आधुनिक यंत्रणा, जलद प्रतिसाद प्रणाली आणि नियमित तपासणी मोहिमा यावर भर दिला आहे. परिणामी, केवळ महसूल वाढ नाही तर नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी अधिक सक्षमपणे पार पाडत विभागाने आर्थिक व सेवा या दोन्ही आघाड्यांवर प्रभावी कामगिरी केली आहे.

करसंकलन विभागाची पुन्हा एकदा विक्रमी कामगिरी

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाने २०२५-२६ या आर्थिक वर्षात ९६१ कोटींहून अधिक मालमत्ता कर वसूल करत सलग दुसऱ्यांदा साडेनऊशे कोटींचा टप्पा पार केला आहे. शहरातील सुमारे ७ लाख ३२ हजार मालमत्तांपैकी ६ लाख ३१ हजार ६१५ मालमत्ताधारकांनी कर भरत सकारात्मक प्रतिसाद दिला. थकबाकीदारांवर कठोर कारवाई, व्यापक जनजागृती, तसेच अभय योजनेतून मिळालेला प्रतिसाद यामुळे महसुलात लक्षणीय वाढ झाली. निवडणूक प्रक्रियेमुळे काही प्रमाणात अडथळे आले असतानाही प्रशासनाने केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळे ही उल्लेखनीय कामगिरी साध्य झाली असून प्रामाणिक करदात्यांमुळेच हे शक्य झाले आहे.

सन्मान केल्या जाणाऱ्या कलाकारांची प्राथमिक यादी

क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या वतीने शहरातील शहरातील कला, साहित्य, नाट्य आणि नृत्य क्षेत्रातील ज्येष्ठ कलाकारांची यादी निश्चित करण्यात आली आहे. त्यामध्ये अभिनेते, पिंपरी चिंचवड पत्रकार संघ चिटणीस मधुकर जोशी, तबलावादक धोंडीराम सायकर, आंतरराष्ट्रीय किर्तीचे नर्तक पद्मश्री नंदकिशोर कपोते, लेखक रमेश वाकनीस, अभिनेते, दिग्दर्शक सुहास जोशी, साहित्यिक, व्याख्याते, कामगार नेते अरूण बोऱ्हाडे, लेखिका कल्पना क्षीरसागर, लेखिका वंदना घांगुर्डे, शास्त्रीय संगीत गायक पंडित चव्हाण, समाज प्रबोधनकार शारदा मुंढे, भरतनाट्यम नृत्यांगना गीता शर्मा, अभिनेते, लेखक, दिग्दर्शक, निर्माते डॉ. संजीवकुमार पाटील, चित्रकार प्रफुल्ल भिष्णूकर, क्रीडा शिक्षक आणि लेखक डॉ. मनोज देवळेकर, कथ्थक नर्तिका वैशाली धोंगडे, अभिनेते, दिग्दर्शक, संगीतकार श्रीकृष्ण (समीर) कालमित्रा, कवियित्री सीमा गांधी, आंतरराष्ट्रीय पातळीवरील चित्रकार संजय काळभोर या कलाकारांचा सन्मान केला जाणार असल्याची माहिती क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभापती कैलास कुटे यांनी यावेळी दिली.